स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
**दिनांक :** ०५/०६/२०२५

## वृक्षप्राधिकरण व उद्यान विभाग

## जागतिक पर्यावरण दिनामिनित्त महानगरपालिकेमार्फत सनसिटी येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न, वर्षभरात शहरात १ लाख वृक्ष लागवड करण्याचा महानगरपालिकेचा संकल्प

आज दि.०५ जून २०२५ रोजी "जागतिक पर्यावरण दिना" निमित्त वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत तुळजाभवानी उद्यान, सनसिटी-गास रोड, वसई (प.) येथील परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. "एक पेड माँ के नाम" या मोहिमेअंतर्गत यावर्षी महानगरपालिका कार्यक्षेत्रात १ लाख वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प महानगरपालिकेने केला असून या मोहिमेची सुरुवात आजच्या वृक्षारोपण कार्यक्रमाने करण्यात आली.

या कार्यक्रमाला मा.आमदार श्री.राजन नाईक, मा.आयुक्त श्री.अनिलकुमार पवार(भा.प्र.से.), माजी महापौर श्री.नारायण मानकर, अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, प्र.शहर अभियंता श्री.प्रदीप पाचंगे, उप-आयुक्त श्री.दीपक झिंजाड, उप-आयुक्त श्री.अजित मुठे, माजी विरोधी पक्षनेते वविशम श्री.विनायक निकम, माजी नगरसेविका श्रीम.किरण चेंदवणकर, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, मान्यवर नागरिक, पत्रकार, वृक्ष व पर्यावरणप्रेमी संस्था, महिला बचत गट, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करताना वृक्ष लागवड व संवर्धनाविषयी माहिती दिली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा महानगरपालिकेतर्फे रोप देऊन सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे ध्यास फाऊंडेशन, नन्हे हात फाऊंडेशन, झेप संकल्प सामाजिक फाऊंडेशन, नैसर्गिक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्था या वृक्ष व पर्यावरणप्रेमी संस्थांचा यावेळी महानगरपालिकेतर्फे रोप देऊन सन्मान करण्यात आला.

महानगरपालिकेच्या या चांगल्या उपक्रमाबाबत मा.आमदार श्री.राजन नाईक यांनी महानगरपालिका वृक्षप्राधिकरण विभागाचे कौतुक केले. महानगरपालिकेने वृक्ष लागवड करावीच पण त्याचबरोबर त्या वृक्षाचे संवर्धन होईल याकडे विशेष लक्ष द्यावे, लावलेली जास्तीत जास्त झाडे जगली पाहिजेत याबाबत महानगरपालिकेने विशेष प्रयत्न करावेत. तसेच झाडे लावणे व ती जगवणे हे केवळ महानगरपालिकेचेच काम नसून नागरिकांचीही तेवढीच जबाबदारी आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन करावे असे मा.आमदार श्री.राजन नाईक यांनी सांगितले. मा.आयुक्त महोदयांनी सांगितले कि, महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने त्याचबरोबर तलाव, स्मशानभूमी, रस्ते दुभाजक, रस्त्याच्या दुतर्फा इ.ठिकाणी महानगरपालिकेमार्फत जवळजवळ ६६ हजार झाडे लावण्यात येत आहेत.

महानगरपालिका क्षेत्रातील इतर जागांवरही वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे काही सेवाभावी संस्था तसेच नागरिकांना झाडे लावण्याचा व ती जगवण्याचा मानस असल्यास महानगरपालिका वृक्षप्राधिकरण विभागामार्फत अशा सेवाभावी संस्थांना व नागरिकांना मोफत झाडे उपलब्ध करून दिली जातील. वृक्ष संवर्धनाकामी महानगरपालिकेने वृक्ष नाहरकत दाखल्या संदर्भात यावर्षी ठराव केला असून त्यानुसार बांधकाम विकासकाला वृक्ष नाहरकत दाखला देतेवेळी विकासकाकडून सुरक्षा अनामत रक्कम जमा करून घेण्यात येते व दाखल्याप्रमाणे लागवड करण्यात येणाऱ्या वृक्षांचे पुढील ७ वर्षे जतन व संवर्धन करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे व तसे न झाल्यास विकासकाकडून भरणा करण्यात आलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येते.

वृक्ष लागवडीस विकासकाकडे जागा उपलब्ध नसल्यास वृक्षांच्या संख्येप्रमाणे लागवड व संगोपनाकामी येणारी रक्कम वृक्षनिधी स्वरूपात महानगरपालिकेकडे भरणा करून घेण्यात येते, व त्या वृक्षनिधीचा उपयोग वृक्ष लागवड व संवर्धनासाठी करण्यात येत आहे. वृक्ष लागवडीच्या ध्येयपूर्ती साठी महानगरपालिका प्रशासनाला विविध पदाधिकारी, सेवाभावी संस्था तसेच सर्व नागरिकांच्या मदतीची अपेक्षा असल्याने सर्वांनी मिळून वृक्षारोपण करून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी एकत्रित प्रयत्न करावे असे आवाहन यावेळी मा.आयुक्त महोदयांनी केले.

वृक्षप्राधिकरण व उद्यान विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका